# आता लसीची सक्ती केल्यास जिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई

## इंडियन बार असोसिएशनकडून दावा; लस ऐच्छिक

**प्रतिनिधी** | नाशिक

कोरोना प्रतिबंधक लस घेण्यासाठी सरकारी कर्मचारी वा अन्य कोणत्याही व्यक्तीस सक्ती केल्यास संबधित जिल्हाधिकारी, अन्य अधिकारी वा कर्मचाऱ्यांविरोधात फौजदारी कारवाईची तरतूद असून लसीच्या सुरक्षिततेबाबत खोटी जाहिरात करून, लस घेण्यासाठी कोणास प्रवृत्ती केले तर संबधिताविरोधात फसवणूक, मृत्यु झाल्यास हत्या, हत्येचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे दाखल होऊ शकतात, असा दावा इंडियन बार असोसिएशनच्या लिगल सेल प्रमुख डॉ. दीपाली ओझा यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

ओझा यांनी म्हटले आहे की, देशात ४५०० पेक्षा अधिक व्यक्तींचा लसींच्या दुष्परिणांमुळे मृत्यू झाला असून त्याबाबतची माहिती वर्तमानपत्रातील बातम्यांद्वारे प्रसिद्ध झाली आहे. मुळात, रेशनकार्डधारक किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस विविध नियम लावून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या लस घेण्यास सक्ती करता येत नाही. असे करणाऱ्या अधिकारी, जिल्हाधिकारी वा डॉक्टरांविरोधात भादंवि कलम १६६, ११५, ५२, १२०(ब), ३४, ३२३, ३३६, ३०७, ३०४(अ), ३२, ३०४ आदी कलमाद्वारे फौजदारी कारवाई होईल. केंद्र शासनाने लस घेण्याची बाब पूर्णत: ऐच्छिक ठेवली असून रेल्वे प्रवास, रेशन, कर्मचाऱ्यांचा पगार व इतर कोणत्याही शासकीय व खासगी सुविधा रोखता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. तसेच मणिपूर राज्य सरकारविरोधातील प्रकरणात मनरेगाच्या सदस्यांचा पगार रोखण्याचे दिलेले आदेशही बेकायदा असल्याचे सांगत तेथील उच्च न्यायालयाने ते रद्द केलेले आहेत. यात न्यायालयाने लस घ्यायची की नाही या निर्णय त्या त्या व्यक्तीने घ्यावा असेही स्पष्ट केले आहे. याच मुद्यावर सर्वाच्च न्यायालय व कर्नाटक न्यायालयानेही आदेश दिले असून लस घेण्याकरिता दबाव बनवण्यासाठी कोणत्याही सुविधा रोखणे हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४, १९ व २१चे उल्लंघन ठरत आहे. दुसरीकडे केंद्र शासनाने लस घेण्यास कोणालाही बंधन घातले नसून त्यामुळे नुकसानभरपाईसाठी तरतूद ठेवलेली नाही. अशा परिस्थितीत लस घेण्यासाठी दबाव टाकणारे अधिकारी हे पीडीत व्यक्तीस भरपाई देण्यासाठी स्वत: जबाबदार राहणार आहेत, असेही ओझा यांनी स्पष्ट केले आहे.